# निशाणी क्र.८९ वरील आदेश

. प्रतिवादी क्र.७ ने सदरचा अर्ज त्याने दाखल केलेली कैफीयत मंजूर करावी म्हणुन दाखल केलेला आहे.

०२ प्रतिवादी क्र.७ चे म्हणणे आहे की,दि.०७.०८.२०२१ रोजी त्यास समन्सची बजावणी झाली,परंतु त्यास दाव्याचे दस्तऐवज मिळाले नाही. म्हणुन त्याने निशाणी क्र.२० व २१ नुसार अर्ज दाखल केले होते व दाव्याची व कागदपत्रांची मागणी केली होती. प्रतिवादीस दि.१२.१०.२०२१ रोजी दाव्याचे कागदपत्र प्राप्त झाले असून निशाणी क्र.२१ वर तशी पोच दिलेली आहे. त्यामुळे दि.०४.१२.२०२१ रोजी कैफीयत दाखल करण्याचा प्रयत्न केला,परंतु तत्कालीन माननीय न्यायाधीश यांची मुख्य न्यायदंडाधिकारी पदावर बदली झाल्यामुळे लेखीजबाब दाखल करता आला नाही. त्यामुळे आज लेखीजबाब दाखल करीत आहे,तेव्हा परवानगी मिळावी.

०३ वादीचे म्हणजे आहे की,अर्जात संयुक्तीक कारण नमूद करण्यात आले नाही. त्यामुळे सदर कारणावरुन अर्ज फेटाळण्यात यावा.

०४ दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०५ प्रतिवादी क्र.७ चा युक्तीवाद बघता त्याने अभिलेख बघता वादीने त्यास दि.१२.१०.२०२१ रोजी दस्तऐवज व दाव्याचे कागदपत्रे पुरविली असल्यामुळे प्रतिवादी क्र.७ ने निशाणी क्र.१ वर प्राप्त केल्याची नोंद घेतलेली आहे. त्यामुळे

दि.१२.१०.२०२१ पासून सदरचा कालावधी विचारात घेता अर्ज व कैफीयत विहित कालावधीत दाखल केली असल्यामुळे तो मंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2022.01.11 16:34:25 +0530

(श्रीमती मृणाल य.डोईफोडे)

दि.१०.०१.२०२२ २रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)

जालना

**प्रमाणपत्र**

निवेदन करण्यात येते की,पी.डी.एफ.फाईल मधील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :–शिरीष दि.देशमुख

न्यायालयाचे नाव :–२रे सह दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना

पी.डी.एफ.दिनांक :–दि.११.०१.२०२२

लघुलेखक(म.)